MHRG110009412021

## नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०२१ मधील
## निशाणी क्रमांक २१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरूस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीने कथन केले की, प्रस्तुतचा दावा ठरावाकरिता व निरंतर ताकीदीच्या मनाई हुकुमाकरिता दाखल केला आहे. त्यांना प्रस्तुतच्या अर्जाद्वारे मालकी जाहीर करुन मिळण्याकरिता मागणी समाविष्ट करायची आहे व त्या अनुषंगाने दाव्यामध्ये बदल करायचा आहे. त्यांनी नमुद केले की, दावामिळकतीच्या मालकी संदर्भात मागणी करायची चुकुन राहुन गेले आहे. म्हणुन दुरुस्ती अर्ज मंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी नमुद केले की, दावामिळकतीबाबत वादीला पुर्ण माहिती होती. मुळ दावा हा फकत निरंतर ताकीदीकरिता दाखल करण्यात आला आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. दावा हा वादीच्या साक्षीदाराच्या उलटतपास घेण्याकरिता प्रलंबित आहे. दावा दुरुस्त करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. म्हणुन त्यांनी अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. अभिलेखावरील दस्तऐवजाची पाहणी केली असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा हा ठरावाकरिता व निरंतर ताकीदीच्या मनाई हुकुमाकरिता दाखल केला आहे. येथे ही बाब नमुद करणे महत्वाचे आहे की,

**रे. मु. नं. ७८/२०२१**
**घनश्याम वि. प्रकाश**

वादीने दाव्यामध्ये दाव्याचे परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केले की, त्यांचे पुर्वगामी राजाराम भेलके यांनी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२—ग प्रमाणे किंमत ठरविली व त्याची संपुर्ण हप्त्याची फेड केली. त्यांच्या मृत्युनंतर वादी यांच्या नावे दावामिळकतीची फेरफार नोंद क्र. २११ नोंदविण्यात आली.

५. वादीने मालकी संदर्भात परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केले आहे परंतु त्याबाबतची मागणी करायची राहुन गेल्याचे दिसुन येत आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीला कोणतीही क्षती व हानी पोहचणार नसल्याचे दिसुन येते. तसेच, प्रस्तुत दावा निकाली काढण्यासाठी व प्रक्रियेची बाहूल्यता टाळयासाठी देखील वरील दुरुस्ती करणे महत्वाचे आहे. वादीने केलेल्या विलंबाबाबत वादीवर योग्य तो खर्च लादुन आदेश करणे देखील महत्वाचे आहे. वरील सर्व कारणांचा एकत्रित विचारकरीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. सदरचा अर्ज रक्कम रु. ५००/— प्रतिवादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादीला रक्कम रु. ५००/— देवुन दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत करून घ्यावी.

३. दुरुस्तीची प्रत सादर करावी.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2023.06.09 18:13:18 +0530

(जी. सी. फुलझळके)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव

माणगांव,
दिनांक : ०९.०६.२०२३